# विकास कामांमुळे वाढली मुंबईत पाणी तुंबण्याची ठिकाणे

लोकमत न्यूज नेटवर्क

## ४८ जागांवर पाणी साचण्याची शक्यता

२०१४ -४० ठिकाणी पाणी तुंबत होते.

२०१७ - २२५ ठिकाणी पाणी तुंबण्याची तक्रार आली.

२०१९ - ४८ नवीन ठिकाणी पाणी तुंबण्याची शक्यता आहे. यापैकी ३६ शहरांत, पाच पश्चिम उपनगरात तर पूर्व उपनगरात सात ठिकाणी पाणी तुंबण्याची शक्यता आहे. त्यामुळे आतापासूनच पालिका प्रशासनाने उपाययोजना हाती घेणे गरजेचे असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

**मुंबई :** रस्ते, पर्जन्य वाहिन्यांची दर्जोन्नती आणि अन्य पायाभूत प्रकल्पांमुळे पाणी तुंबण्याच्या ठिकाणांमध्येही वाढ झाली आहे. पाच वर्षांपूर्वी मुंबईत केवळ ४० ठिकाणी पाणी तुंबण्याच्या तक्रारी येत होत्या, तर दोन वर्षांपूर्वी हेच प्रमाण २२५ वर पोहोचल्याने तक्रारींचे निवारण करण्याचे लक्ष्यच प्रशासनाने अधिकाऱ्यांना दिले होते. मात्र, या वर्षी ४८ नवीन ठिकाणे आढळून आली आहेत. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात मुंबईकरांची गैरसोय वाढणार आहे.

पावसाळ्याला अवघा एक महिना उरला असल्याने, मान्सूनपूर्व कामे वेगाने सुरु आहेत. मात्र, नाल्यांच्या सफाईबाबत राजकीय पक्षांकडून नाराजी व्यक्त होत असताना आणखी एक नवीन अडचण उभी राहिली आहे. मुंबईत ३६ आणि पूर्व उपनगरात सात व पश्चिम उपनगरात पाच ठिकाणी पाणी तुंबण्याची शक्यता आहे. मोठ्या प्रमाणात सुरू असलेली पायाभूत प्रकल्पांची कामे आणि विकास कामांमुळे ही समस्या उभी राहिल्याचे सांगण्यात येत आहे.

मेट्रो रेल्वेच्या कामामुळेही काही भागांना फटका बसण्याचा धोका निर्माण झाला असल्याची भीती पर्जन्य जलवाहिन्या विभागातील अधिकाऱ्याने व्यक्त केली आहे. गेल्या वर्षी चर्चगेट आणि कफ परेड येथे पहिल्यांदाच पाणी तुंबले होते. यावेळेस पावसाळ्यात चर्चगेट, परळ, हिंदमाता आणि लालबाग या ठिकाणी पाणी तुंबण्याची शक्यता आहे. दरम्यान, गतवर्षी २२५ ठिकाणांपैकी १२० ठिकाणी या वर्षी पाणी तुंबणार नाही. मात्र, तुंबल्यास त्याचा निचरा जलदगतीने होईल, असा दावा पालिकेने केला आहे. मात्र, या दाव्यात कितपत तथ्य आहे, हे आगामी काळात पाऊस आल्यानंतरच समजेल, असा सूर मुंबईकरांमध्ये आहे.